भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०१/२०१७

**१) मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु . :—**

दिनांक ०२/०१/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील बिना नंबरची मोटार सायकल भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन श्रीनगर कॉलोनी कडुन प्रगती कॉलोनी कडे येण्यासाठी एनएच ०६ रोड क्रास करीत असतांना साकोली कडुन सेंदुरवाफाकडे जाणा—या मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी ५०९४ स्प्लेंन्डर मोटार सायकलला धडक मारल्याने मृतक चालक जयचंद राजुजी गोटेफोडे वय ५२ वर्ष, रा. लवारी यांचे डोक्याला गंभिर दुखापत झाल्याने त्यास उपचारा करीता मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट, पोस्टे अजनी नागपुर येथे- कागदपत्र व पोस्टे अपघात रजीस्टर क्र. ०२/१७ दि. ०२/०१/२०१७ चे चौकशी वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) पोस्टामध्ये पैसे भरण्याच्या लाईनमध्ये उभी असतांना बॅगमधुन नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक १२/०१/२०१७ चे १३.०० वा दर. यातील फिर्यादी राधा राजेन्द्र डोमे ३९ वर्ष, रा. सहकार नगर गणेशपुर ही आर्डीचे पैसे पोस्ट ऑफीस भंडारा येथे भरण्यास लाईन मध्ये उभी असतांना फिर्यादीच्या काळया रंगाचा बॅग मधुन २,०००/रु. च्या ०९ नोटा, १,००/—रु. चया २० नोटा असा एकुण २०,०००/—रु. कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मेटॅडोरच्या चालकांच्या निष्काळजीपणाने मोटार सायकल चालकास व बसलेल्या तीन्ही लोकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०१/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील फिर्यादी रामकृष्ण सिताराम गायकवाड वय ६२ वर्ष, रा. आमगाव खुर्द याचा मुलगा सुनील गायकवाड वय ३० वर्ष, रा. आमगाव खुर्द हा आपल्या परीवारासोबत मोटार सायकल क्र. एमएच ३५ आर ५९७९ ने बाहेर गावी जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने व भरधाव वेगाने, धोकादायक रित्या चालवुन मोटार सायकलला धडक मारुन मुलगा, सुनील, सुन सौ. पुष्पा, नातु, सुजल, नातीन परी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पो.स्टे साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्कुटी चालक महीलेस जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०१/२०१७ चे १६.३० वा. यातील फिर्यादी सौ. रंजुशा मनोज घुंगरुड वय ३६ वर्ष, ओम नगरी कोराडी रोड नागपुर ही आपली स्कुटी क्र. एमएच ३१ ई. डब्लु ७२६३ ने नागपुर कडे जात असतांना यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने रॉग साईडने चालवुन जखमीच्या स्कुटीला धडक मारुन जखमी केल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पो.स्टे जवाहरनगर कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम २ आर आर १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १२/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, अवैध प्रवासी वाहनावरती ०२ तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८६ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता